**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात....**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/१२३/२०२३

दिनांक- ३१.०१.२०२५

**प्रति,**

१. चिदानंद सिद्राया माळी

रा. साळमाळगेवाडी, ता.जत, जि. सांगली .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. लक्ष्मीबाई सिद्राया माळी

२. तायव्वा ऊर्फ कस्तुरी दुडाप्पा माळी

३. सुनिता अनिल माळी

४. सुशिला सिद्राया माळी

५. साधना भैरवनाथ माळी

६. सचिन भैरवनाथ माळी

७. मनोज भैरवनाथ माळी

८. गौरी भैरवनाथ माळी अपाक अ.क्र.५

९. शिवानंद सिद्राया माळी

अ.क्र.१ व २ रा.बिळूर ता.जत जि.सांगली

अ.क्र.३ रा.बसाप्पावाडी ता.कवठेमहांकाळ जि.सांगली

अ.क्र.४ ,६ ते ९ रा.साळमाळगेवाडी ता.जत जि.सांगली

अ.क्र.५ रा.नारी विदयालय, उगार खुर्द ता.अथणी जि.बेळगांव ----- **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे. साळमाळगेवाडी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर २८८/१ या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, जत यांनी फेरफार नंबर २१०६ प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

प्रस्तुत अपिलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपिल मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे याचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे. साळमाळगेवाडी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर २८८/१ या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, जत यांनी फेरफार नंबर २१०६ प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

२. अपिलार्थी हे त्यांचे अपील अर्जामध्ये जाबदार ४ ही मयत सिद्राया माळी यांची यांची पहिली पत्नी असून जाबदार २ ही दुसरी पत्नी असलेचे कथन करीत आहेत. तथापि त्याअनुषंगाने कोणतेही कागदोपत्री पुरावे सादर करीत नाहीत. अपिलार्थी यांनी वंशावळ सादर केलेली असून सदर वंशावळ भारतीय पुरावा कायदयातील तरतूदीनुसार कागदोपत्री पुराव्यासह सदर वंशावळ सिध्द केलेली नाही. अपिलार्थी यांनी दाखल केलेले अपील अर्ज पहाता दिवाणी स्वरूपाचे मुद्दे उपस्थीत करून ०९ महिणे इतक्या विलंबाने तथ्यहीन अपील दाखल करून

न्याय मागणेचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे अपिलार्थी यांचे दाखल अपील अर्जातील उपरोक्त वस्तुस्थीती व कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता अपिलार्थी यांनी वारसांबाबत सक्षम दिवाणी न्यायालयामध्ये दाद मागणे उचीत होणार आहे.

३. विलंबाबाबत म्हणावे तर ०९ महिन्याचे विलंब माफ करावे असे कोणतेही कारण विलंब माफ अर्जात नाही. मुळात अपिलार्थी यांची अपिल अर्जातील मागणी ही दिवाणी स्वरूपाची आहे. त्यासाठी त्यांनी दिवाणी न्यायालयात दाद मागणे आवश्यक आहे. तसेच कोणतेही संयुक्तिक कारण नसतांना केलेला विलब अर्ज कायदयाचे कसोटीवर टिकू शकत नाही. सबब मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचे अपील विलंब माफ अर्जाचे मुद्दयावर फेटाळणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण -जत
दिनांक - ३१.०१.२०२५

प्रत- तहसिलदार जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.